# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक: २अ/एडीएम/२०१८/ १०८१
दिनांक : 21 AUG 2018

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची माहिती संकेतस्थळावर अद्ययावत करण्याची तसेच प्रवेश प्रकियेच्या अनुषंगाने इतर बाबींबाबत

संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/१०८० दिनांक १४.०८.२०१८

वरील विषयाबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील सर्व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक (Cut off Date) ३१.०८.२०१८ निश्चित करण्यात आलेला आहे. **त्याअनुषंगाने खालील बाबी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक संस्थांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.**

०१. प्रवेशाचा अंतिम दिनांक ३१.०८.२०१८ निश्चित करण्यात आलेला असल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर अद्ययावत (Uploading ) करण्याकरिता अंतिम दिनांक ३१.०८.२०१८ (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) प्रवेशाचा अंतिम दिनांक म्हणून निश्चित करण्यात येत आहे.
०२. प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक विचारात घेऊन, प्रवेश रद्द करण्यासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना मूळ कागदपत्रे व शुल्क परताव्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.
०३. केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फेरीनंतर रिक्त असलेल्या व संस्थास्तरावरील रिक्त जागेवर प्रवेश मिळण्यासाठी इच्छुक उमेदवारांना अर्ज करण्यासाठी, प्रवेश अर्ज नोंदणी (Registration for Non CAP Admission) चा अंतिम दिनांक सुदधा सुधारित अंतिम दिनांकानुसार दिनांक ३१.०८.२०१८ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सुरु ठेवण्यात येत आहे.

( डॉ. अभय वाघ )
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 2817
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 23-AUG 2018

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची माहिती संकेतस्थळावर अद्यावत करावी व दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर